नवशक्ति
marathi.freepressjournal.in

चारित्र्यावर संशयावरून विवाहितेचा छळ

नांदेड : चारित्र्यावर संशय घेऊन एका विवाहितला नांदवायास येण्यासाठी माहेरहून मोटार सायकल घेण्यासाठी एक लाख रूपये आणण्यासाठी सासरच्या मंडळींनी छळ केला. ही घटना अर्धापूर तालुक्यातील देव येथे ३० जुन २०२२ पासून ते आजपर्यंत घडली आहे.

थो । ड । क्या । त महत्त्वाचे

पत्नीची हत्या करून पतीची आत्महत्या

बुलडाणा : रागाचा पारा पार झाला की सुखी संसाराचाही शेवट झाल्याच्या अनेक घटना देखील समोर येतात. बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद येथेही अशीच काहीशी घटना घडली आहे. जळगाव जामोद पोलीस स्टेशन हद्दीमध्ये येत असलेल्या माऊली भोटा येथे ६० वर्षीय मनोरुग्न पतीने झोपेत असलेल्या पत्नीच्या मानेवर कुऱ्हाडीचा घाव घालत हत्या करून स्वतःनेही घराच्या छताच्या लोखंडी अँगलला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. ही घटना काल उघडकीस आली. जळगाव जामोद तालुक्यातील माऊली भोटा येथील रहिवासी असलेले बुधाजी वानखेडे हे मानसिक रोगी असल्यामुळे गावाजवळ असलेल्या शेतामध्ये वृद्ध व त्यांची पत्नी दोघेजण झोपडीत राहत होते. चार दिवसांपासून बुधाजी वानखेडे हे स्वतः बडबड करत होते. तसेच विनाकारण पत्नी शोभाबाई यांच्यासोबत भांडण करत होते. २७ डिसेंबरला रात्री शोभाबाई यांचा बुधाजी यांनी रात्रीच्या सुमारास गाढ झोपेत असलेल्या शोभाबाईंची कुऱ्हाडीने मानेवर घाव घालून हत्या केली. तसेच स्वतःने झोपडीच्या मध्यभागी असलेल्या लोखंडी अँगलला दोरी बांधून गळफास घेऊन आत्महत्या केली.

चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीचा बिगुल वाजला

कोल्हापूर : साडेसहा वर्षानंतर अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीचा बिगुल अखेर वाजला. संचालक मंडळातील अंतर्गत वादामुळे ही निवडणूक महामंडळाच्या जुन्या घटनेनुसार घ्यायची कि नव्या घटनेनुसार याबाबत वाद सुरू आहेत. गेल्या पाच वर्षातील लेखाजोखा आणि सर्वसाधारण सभा न झाल्यामुळ सभासदांनी तो पोस्टरबाजीच्या माध्यमातून मांडला. कोरोनामुळे महामंडळाच्या या निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या. परंतु आता अखिल भारतीय महामंडळाच्या निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर या निवडणुकीत कोण बाजी मारणार आणि सभासद कोणाला कौल देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

विदर्भ हैराण, सत्ताधारी खातो गायरान!

नागपूर : राजीनामा द्या, राजीनामा द्या.. भ्रष्ट मंत्री राजीनामा द्या, विदर्भ हैराण, सत्ताधारी खातो गायरान, खाऊन खाऊन ५० खोके.. माजले बोके, माजले बोके अशा घोषणा देत महाविकास आघाडीच्या आमदारांनी सत्ताधाऱ्यांविरोधात जोरदार निदर्शने केली.

इंदू मिल स्मारकासाठी कालबद्ध कार्यक्रम

नागपूर : मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याचे काम कालबद्ध कार्यक्रम ठरवून लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी विधान परिषदेत दिली.

विधान परिषद सदस्य विक्रम काळे, सतीश चव्हाण यांच्यासह ७ सदस्यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सामंत म्हणाले, की ''आमचे सरकार सत्तारूढ झाल्यावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी स्वतः स्मारकाच्या कामाची पाहणी केली असून सर्व अडचणी दूर करण्यासाठी पाऊले उचलली आहेत, या संदर्भात त्यांनी कालबद्ध कार्यक्रम निश्चित केला असून लवकरात लवकर हे स्मारक पूर्ण केले जाईल,'' असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

पोलीस वसाहतींसाठी २ हजार कोटी

राज्यातील जुन्या झालेल्या पोलीस वसाहतींचे पुनर्निर्माण करण्याचा मास्टर प्लॅन तयार झाला असून हे काम पूर्ण करण्यासाठी २ हजार कोटी रुपयांची तरतूदही करण्यात आली असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तरांच्या तासात दिली.

मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास योजनांमध्ये झालेल्या गैरप्रकारांबद्दल तत्काळ कारवाई करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत प्रशनोत्तरांच्या तासात दिले. यातील अनेक योजनांमध्ये मृत व्यक्तींच्या नावावर घरे दाखवण्याचा प्रकार घडला असल्याकडे सदस्यांनी लक्ष वेधले, तेव्हा एक महिन्यात अशी प्रकरणे शोधून मृतकांची नावे काढली जातील आणि गैरप्रकार करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

पुनर्विकास कामातील बांधकामांमध्ये काही विकासक ईडीच्या तडाख्यात सापडल्याने त्यांच्या इमारती ईडीने ताब्यात घेतल्या आहेत. या प्रकारामुळे काहीही दोष नसतांना गाळेधारक त्रासात सापडले आहेत, याकडे सदस्यांनी लक्ष वेधले असता, ईडीला अशा इमारती तत्काळ मोकळ्या करण्यासाठी विनंती करून तिथे काम सुरु केले जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

राज्यातील शेतकऱ्यांना शेतात सौरऊर्जा निर्मिती करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण असून २०२५ पर्यंत राज्यातील २५ टक्के शेतकरी शेतात सौरऊर्जेचा उपयोग करत राहावे असा शासनाचा प्रयत्न असल्याची माहिती उपमुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तरांच्या तासात दिली. विधानपरिषद सदस्य प्रवीण दटके यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात ऊर्जामंत्री म्हणाले की शेतकऱ्यांच्या शेतात विद्युत जोडण्या देण्याच्या कामात नोव्हेंबर अखेरपर्यंत ५७१९४ मागण्या प्रलंबित होत्या त्यापैकी १९००० जोडण्या दिल्या आहेत, तर उर्वरित सर्व प्रलंबित मागण्या मार्च २०२३ पर्यंत पूर्ण केल्या जातील.

मुंबईतील मालाड परिसरातील म्हाडाच्या जागेवर अतिक्रमण झाले असल्याचे मान्य करीत हा भूखंड परत घेण्याबाबत प्रयत्न सुरु असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तरांच्या तासात दिली. विधान परिषद सदस्य सुनील शिंदे, विलास पोतनीस प्रभृतींनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात फडणवीस यांनी सांगितले की हा भूखंड पोलीस कोऑप हाऊसींग फेडरेशन यांना देण्यात आला होता, या भूखंडावर अनधिकृत भरीव टाकून लग्नमंडप उभारण्याचे काम झाल्याचे कळल्यावर म्हाडाने ते काम थांबवले आहे, या प्रकरणात चौकशीचे आदेश देण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रायगड जिल्ह्यातील बोकडवीरा गावाजवळ असलेल्या महानिर्मितीच्या वायुविद्युत केंद्रात झालेल्या भीषण स्फोटातील मृतक अभियंता आणि तीन कर्मचाऱ्यांच्या वारसांना आवश्यक ती मदत देण्यात आली असून यातील अभियंत्याच्या पत्नीला कंत्राटी तत्वावर नोकरीही देण्यात आले असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तरांच्या तासात दिली.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह १३ विधान परिषद सदस्यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात उपमुख्यमंत्री म्हणाले की या स्फोटात बॉईलरचे नियमित परीक्षण झाले होते, तरीही हा स्फोट का झाला? याची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल, आणि चौकशीत दोषी आढळलेल्यांवर कारवाई केली जाईल. अश्या बॉयलरच्या घडणाऱ्या दुर्घटना लक्षात घेता बॉयलरचे नियमित परीक्षण आणि दुरुस्ती याबद्दल निश्चित धोरण ठरवून ते राबवले जाईल, असेही उपमुख्यमंत्र्यांनी मान्य केले.

आयआयबी आता कोल्हापुरात

आयआयबीत नीट सह जेईई ची तयारी

प्रतिनिधी/नांदेड : मागील दोन दशकांपेक्षा अधिक काळापासून महाराष्ट्रातून एमबीबीएस साठी सर्वाधिक विद्यार्थी पाठवणारे एकमेव इन्स्टिट्यूट असलेल्या आयआयबी ने महाराष्ट्राची करवीर नगरी असलेल्या कोल्हापुरात पाऊल टाकले असून नांदेड, लातूर व पुणे येथील यशानंतर आयआयबीची चौथी शाखा कोल्हापुरात कार्यान्वित होणार आहे.

आयआयबीच्या कोल्हापुरातील शाखेच्या पार्श्वभूमीवर अधिक माहीती देतांना आयआयबीचे संचालक श्री. बालाजी वाकोडे पाटील यांनी सांगितले की, नांदेड, लातूर व पुण्याच्या धर्तीवरच आधारीत असलेल्या सर्व सुविधा तसेच शिक्षकवृंद आणि व्यवस्थापन टिम ही तिथे कार्यान्वित असेल ज्यामुळे कोल्हापुर तसेच परिसरातील जिल्हयातील विद्यार्थ्यांना आयआयबीच्या गुणवत्तापूर्ण पॅटर्नचा लाभ कोल्हापुरात मिळणार आहे.

आयआयबीच्या लातूर शाखेच्या धर्तीवर कोल्हापुरातही आयआयबीत नीट सह जेईई ची ही तयारी करून घेण्यात येणार असल्यामुळे कोल्हापुरकर विद्यार्थ्यांना डॉक्टर / इंजिनिअर बनायचंय ? तर मग चिंता असण्याचे कारण नसणार आहे कारण महाराष्ट्राचा महाब्रॅण्ड संपूर्ण भारतात नावलौकिक असलेला महाराष्ट्राचा महाब्रॅण्ड आयआयबी नांदेड, लातूर आणि पुणेच्या अपार यशानंतर कोल्हापूर शहरात आपल्या ११ वी, १२ वी, Board, NEET व JEE च्या तयारीसाठी देशातील तज्ञ प्राध्यापक व उत्कृष्ट मॅनेजमेंट टीमसह आपल्या दाखल झाला आहे.

आयआयबी महाफास्ट परीक्षेचे आयोजन..

इ. १० वीतून ११ वीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत प्रवेश आणि शिष्यवृत्ती चाचणी महाफास्ट परीक्षा आयआयबीच्या सर्व शाखांकरिता असेल. ही परीक्षा रविवार दि.२२ जानेवारी २०२३ रोजी होणार आहे. परीक्षा ऑनलाईन पद्धतीने होईल. परीक्षेची वेळ विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारे कळवली जाईल.

लोकसहभागातूनच नदीचे स्वरूप बदलेल

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत

प्रतिनिधी/नांदेड

लोकसहभागाशिवाय, नदीच्याकाठावर असलेल्या गावातील लोकांच्या योगदानाशिवाय नदीचे आरोग्य निरोगी होऊ शकणार नाही. गावाच्या पर्यावरणासाठी श्रमदान व निःस्वार्थ लोकसहभाग यात एक वेगळी शक्ती दडलेली असते. आपण ज्या भागात वाढतो, मोठे होतो त्या भागाच्या विकासासाठी, जपणुकीसाठी जेंव्हा त्या-त्या भागातील लोक पुढे सरसावतात त्या चळवळीला, अभियानाला सकारात्मकता येते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले. देगलूर तालुक्यातील शेवाळा येथे मन्याड नदी संवाद यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत व गावकऱ्यांसह सुरू झालेल्या या यात्रेत मन्याड नदीचे समन्वयक प्रमोद देशमुख, शिवाजी देशपांडे, शेवाळाचे सरपंच शिवकुमार पाटील, आलूरचे सरपंच राजू देसाई, राज्य समिती सदस्य डॉ. सुमन पांडे, पर्यावरण तज्ज्ञ अजीत गोखले, देगलूरचे तहसिलदार राजाभाऊ कदम व मान्यवर उपस्थित होते. जनसामान्यांना नदीसाक्षर करण्यासाठी, त्यांच्यासमवेत नदीला समजून घेत तिला "अमृत वाहिनी" करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने "चला जाणुया नदीला" हे अभियान हाती घेतले आहे. नदी समन्वयक प्रमोद देशमुख व शिवाजी देशपांडे यांनी या नदीसंवाद यात्रेत मन्याड नदीला दोन प्रवाहात विलग करणाऱ्या वझरगा येथील बेटाची माहिती दिली.

वझरगा येथून मन्याड नदी विलग झाल्याने लिंबा येथे १९७५ पासून सुरू असलेले उपसा जलसिंचन योजना बंद पडली. ही योजना पुन्हा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्यासाठी या ठिकाणी असलेल्या मन्याड नदीच्या पात्रातील गाळ काढण्याशिवाय गत्यंतर राहिले नाही.

सफाई कामगार प्रश्नांसाठी उपमुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती

प्रतिनिधी/नागपूर : सफाई कामगारांच्या वारसांसाठी लाड-पागे समितीने केलेल्या शिफारशींच्या सोबतच इतर प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती नेमण्यात आली असून, या समितीच्या शिफारशींना मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता घेऊन लाभ दिले जातील, असे प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत सांगितले. संजय केळकर, संजय गायकवाड, योगेश सागर, आशिष जयस्वाल आदिंनी लक्षवेधीच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केला होता. या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेला सामंत म्हणाले, ''सफाई कामगार वारसांच्या विषयांशी निगडीत प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी तत्कालीन कामगार आयुक्त लाड आणि तत्कालीन सभापती पागे यांच्या समितीने केलेल्या शिफारसी शासनाने सन १९७५ ला स्वीकारल्या. त्यानंतर वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले. हे सर्व शासन निर्णय एकत्रित करून लाड-पागे समितीने केलेल्या शिफारसींनुसार सफाई कामगारांना शासकीय सेवेचा लाभ देण्याबरोबरच इतर विषयांवरचा अहवाल या उपसमितीमार्फत देण्यात

उदय सामंत यांची माहिती

प्रपत्र ५३ (रेग्युलेशन ६० (१५))

भारत सरकार
वित्त मंत्रालय वित्तीय सेवा विभाग
मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. १
एमटीएनएल भवन, २रा मजला, स्ट्रण्ड रोड, अपोलो बंदर,
कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई- ४००००५.
वसुली अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण-१, मुंबई समक्ष
वसुली कार्यवाही क्र. १०८३ सन २०१६

स्टेट बँक ऑफ इंडिया ....**प्रमाणपत्र धारक**
विरूध्द
मे. परफेक्ट बिल्डर्स आणि अन्य ....**प्रमाणपत्र ऋणको**

विक्रीची उद्घोषणा मांडण्याकरिता सूचना

प्रति,
१. मे. परफेक्ट बिल्डर्स
एक भागीदारी संस्था, जिचा कार्यालय येथे एच३, फ्लॅट क्र. १४, स्वर्णरेखा बिल्डिंग, लोकग्राम, कल्याण (पूर्व), जिल्हा ठाणे, पिन-४२१३०६.
२. **श्री. लक्ष्मण काशीनाथ गुजर,** यांचे कार्यालय येथे जिचा कार्यालय येथे एच३, फ्लॅट क्र. १४, स्वर्णरेखा बिल्डिंग, लोकग्राम, कल्याण (पूर्व), जिल्हा ठाणे, पिन-४२१३०६.
३. **श्रीम. सुषमा लक्ष्मण गुजर,** यांचे कार्यालय येथे जिचा कार्यालय येथे एच३, फ्लॅट क्र. १४, स्वर्णरेखा बिल्डिंग, लोकग्राम, कल्याण (पूर्व), जिल्हा ठाणे, पिन-४२१३०६.
४. **श्री. मच्छिंद्र यमनाप्पा गुजरे,** खोली क्र. ७२, कुर्ला कलिना रोड, कलिना, सांताक्रुझ (पू), मुंबई-४०००९८.

ज्याअर्थी सन्माननीय पीठासिन अधिकारी यांनी वसुली प्रमाणपत्रानूसार व्याज आणि खर्चासह **रु. २,१८,६९,६६७.३२ (रुपये दोन करोड अठरा लाख एकोणसत्तर हजार सहाशे सदुसष्ट आणि पैसे बत्तीस मात्र)** ची रक्कम अर्जदार बँकेला चुकती करण्यासाठी ओ.ए. क्र. ३०९ सन २००९ मधील वसुली प्रमाणपत्र निर्गमित केले होते.

ज्याअर्थी तुम्ही रक्कम चुकती केलेली नाही आणि निम्नस्वाक्षरीकारांनी खालील नमूद मिळकत जप्त केली आणि तिच्या विक्रीचे आदेश दिले.

तुम्हाला याद्वारे कळविण्यात येते की विक्रीची उद्घोषणा काढणे आणि तिच्या अटी मांडण्याकरिता २४/०१/२०२३ रोजी दु. १२.०० वा. निश्चित करण्यात आली आहे. तुम्हाला उद्घोषणा मांडणीमध्ये सहभागी होण्याकरिता आणि सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागाशी संबंधित कोणताही बोजा, प्रभार, दावे किंवा दायित्वे निम्नस्वाक्षरीकारांना कळविण्यासाठी याद्वारे बोलाविण्यात येत आहे.

मिळकतीचा परिशिष्ट

जंगमगहाण वस्तु, म्हणजेच, सर्व सध्याचे आणि भविष्यातील स्टॉक्स, कच्चा माल, तैयार माल, वाहने आणि येणे, मालाचे नामाधिकारचे दस्तावेज, बुक डेब्टस् आणि मशिनरीज्, इ. समाविष्टीत सर्व इतर जंगम मत्ता.

स्थावर मिळकत, म्हणजेच, महाराष्ट्र राज्याच्या बृहन्मुंबई महानगर पालिकेचे स्थानिक हद्दीमध्ये, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणी जिल्हा आणि उपजिल्ह्यामध्ये तालुका अंधेरी च्या सर्व्हे क्र. १०३, २५७, सीटीएस क्र. १७७४, दयाळदास रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७ धारक जमीन, मोजमापित ६५०० चौ. फू. सह भवानी गोडाऊन अशा ज्ञात त्यावर उभी रचना, मोजमापित ४,००० चौ. फू.

सदर २८ डिसेंबर, २०२२ रोजी मुंबई येथे माझ्या हस्ते आणि न्यायधिकरणाच्या शिक्क्यासह दिले.

सही/-
अजित त्रिपाठी
(वसुली अधिकारी)
डीआरटी-I, मुंबई

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, श्री. हेमंत के मेहता आणि सौ. निर्मला एम मुनोत हे ईएसआयएस हॉस्पिटल समोर, आकुर्ली रोड लगत, कांदिवली (पू), मुंबई-४००१०१ येथे स्थित कल्पतरू टॉवर्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (सोसायटी) च्या टॉवर ए मधील २३व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. २३२ त्यासह वाटप केलेल्या कार पार्किंग स्पेस (परिसर) च्या वापराच्या हक्काचे संयुक्त सदस्य असून त्यांनी सोसायटीला असे कळविले आहे की, विभिन्न क्र. ०८७१ ते ०८८० धारक १० शेअर्सकरिता जारी क्र. ०८७ धारक शेअर प्रमाणपत्र हरवले/गहाळ झाले आहे/चोरीला गेले आहे आणि त्यांनी सोसायटीला सदर परिसरांच्या संदर्भात प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करण्यासाठी अर्ज केला आहे.

सोसायटी याद्वारे प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्राच्या जारीकरिता दावेदार/आक्षेपक यांच्याकडून दावे किंवा आक्षेप असल्यास ते सदर सूचनेच्या प्रसिध्दीपासून १५ दिवसात प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्राच्या जारीकरिता तशा दावे, आक्षेपांच्या पुरक आणि पृष्ठ्यर्थ दस्तावेजांच्या प्रतींसह सोसायटीच्या सचिवांकडे मागवित आहे. कसूर केल्यास तशा व्यक्ती, हक्कदार, संस्था, फर्म इ. चा तसा आक्षेप, दावा, हक्क किंवा भार जर काही असल्यास ते त्यागित किंवा परित्यागित समजले जातील आणि श्री. हेमंत के मेहता आणि सौ. निर्मला एम मुनोत आणि/किंवा सोसायटीवर बंधनकारक नसतील आणि सोसायटी सदर परिसराच्या संदर्भात प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करण्यास मोकळी असेल.

दिनांक: ३०/१२/२०२२
ठिकाण: मुंबई सही/-
सचिवद कल्पतरू
टॉवर्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड
कल्पतरू टॉवर्स सीएचएसचे सोसायटी कार्यालय,
तळ मजला, ए विंग, कल्पतरू टॉवर्स,
आकुर्ली रोड लगत, कांदिवली पूर्व, मुंबई ४००१०१.
वकील अस्मिता केरकर
(९८६९०१०४८७)
उच्च न्यायालय, मुंबई

सार्वजनिक सूचना

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, आमचे अशिल शीतल सुधीर सावंत ही मालमत्तेच्या सूचीमध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेली मालमत्ता खरेदी करण्याचा विचार करत आहे आणि ती सदर मालमत्ता खरेदीसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, आरएसीपीसी चिंचपोकळी, मुंबई यांच्याकडून गृहकर्ज घेण्याचा विचार करत आहे.

ज्याअर्थी, त्याचे प्रतिनिधित्व सध्याचे मालक/इच्छित विक्रेते म्हणजेच श्री. सुदीप दत्तात्रेय जाधव, त्या आधीच्या साखळी दस्तऐवजाच्या रूपात म्हणजे दिनांक ०५/०३/१९८७ चा करारनामा दिनांक ०२/०८/१९९४ च्या पुष्टीकरणाच्या डीडसह वाचलेले आहे, जो अनु. बीबीजे/५३८/१९४ अंतर्गत मुंबई येथील उपनिबंधक कार्यालयात रीतसर नोंदणीकृत होता. मे हर्षा लँड डेव्हलपर्स एका भागाचे (त्यात विक्रेता) म्हणून आणि दुसऱ्या भागाचे (त्यातील खरेदीदार) श्री. प्रकाश अप्पाजी चौगुले च्या दरम्यान प्रवेश केला, हे उपलब्ध नाहीत, आणि ते हरवले आणि गहाळ झाले आहेत, आमचा क्लायंट शेड्यूल केलेली मालमत्ता खरेदी करण्याचा विचार करत आहे आणि त्यानंतर आधीच्या साखळी दस्तऐवजांच्या अनुपस्थितीत स्टेट बँक ऑफ इंडिया, आरएसीपीसी, चिंचपोकळी, मुंबई यांच्याकडे सूचीमधील मालमत्ता गहाण ठेवण्याचा मानस आहे.

उपरोक्त करारांद्वारे कोणताही दावा करणारी कोणतीही व्यक्ती आणि किंवा कोणत्याही करार, उपक्रम, विक्री करार यासह कोणत्याही प्रकारे या मालमत्तेवर किंवा त्या मालमत्तेच्या ताब्याबाबत कोणताही हक्क, अधिकार, स्वारस्य किंवा दावा आहे किंवा दावा करत आहे, हस्तांतरण, देवाणघेवाण, वाहतूक, सुविधादिकार, शुल्क, गहाण, भेट, न्यास, वारसा, भाडेपट्टा, धारणाधिकार, मासिक भाडेकरू, संमति नि परवानगी, भागीदारी, संयुक्त उपक्रम, सुलभता, प्रिस्क्रिप्शनचा अधिकार, कोणताही प्रतिकूल हक्क किंवा कोणत्याही स्वरूपाचा दावा, विवादित खटला, हुकूम, आदेश, प्रतिबंधात्मक करार, मनाई आदेश, जप्ती, संपादन किंवा अन्यथा त्यावर अन्य काही असल्यास अधोस्वाक्षरीदारांना ते प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून **१४ दिवसांच्या** आत लेखी स्वरूपात कळवणे आवश्यक आहे एकतर योग्यरित्या लिखित पोचपावती विरुद्ध हाताने वितरणाद्वारे खाली स्वाक्षरी केलेले किंवा नोंदणीकृत एडी पोस्ट द्वारे, अयशस्वी झाल्यास असा कोणताही दावा असल्यास तो माफ केला जाईल आणि/किंवा सोडला जाईल असे मानले जाईल.

मालमत्तेची अधिसूची

गाव कांजूर, तालुका कुर्ला येथे, नोंदणी जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील उप-जिल्हा आणि बृहन मुंबई महानगरपालिका हद्दीत सोमेश्वर को-ऑप.हाऊ. सोसायटी लिमिटेड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, दातार कॉलनी, प्लॉट क्र.११, भांडुप (पूर्व), मुंबई-४०००४२, सीटीएस क्र. ७५४, तळमजल्यावर, फ्लॅट क्र. ३, ४७० चौरस फूट बिल्ट अप एरिया.

वकील परिनीत सरटकर
पार्टनर
मे. एसएसपी लीगल
१७-बी, ३रा मजला, कृष्णा निवास,
२८१ एसबीएस रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
ठिकाण: मुंबई **तारीख:** ३०/१२/२०२२

मत्तेची ऑनलाईन ई-लिलाव विक्री
कोटक महिंद्रा बँक लिमिटेड
नोंद. कार्यालय : २७ बीकेसी, सी-२७, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई, महाराष्ट्र, पिन कोड - ४०० ०५१. **शा. का.:** २२, ०५ वा मजला, अदामास प्लाझा, १६६/१६, सीएसटी रोड, कलिना, सांताक्रुझ (पू), मुंबई-४०००९८

स्थावर मिळकतीच्या विक्रीसाठी विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ नियम ८ (५) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ९(१) च्या तरतुदी अन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

विशेषत: कर्जदार आणि हमीदार आणि आम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, कोटक महिंद्रा बँक लिमिटेड (केएमबीएल) तारण धनकोकडे गहाण/प्रभारित खाली नमूद स्थावर मिळकत, जिच्या प्रत्यक्ष कब्जा एस्सेल फायनान्स बिझनेस लान लिमिटेड त्यांच्या नावामधील कर्जाच्या अभिहस्तांकनान्वये केएमबीएल चे प्राधिकृत अधिकारी यांनी **२४.०५.२०२२** रोजी घेतला आहे, जिचे **ग्लोरी एन्टरप्रायझेस तिच्या मालक श्री. विजय ऑगस्टिन बार्सी मार्फत, श्री. विजय ऑगस्टिन बार्सी आणि श्रीम. अनिता बार्सी** यांच्याकडून केएमबीएल, तारण धनकोकडे **कर्ज खाते क्र. एलएनएमयुएम००६१४-१५००००७६,** अंतर्गत वसूली पर्यंत पुढील व्याजासहित **१६.१२.२०२२** रोजी प्रमाणे **रु. ३६,८९,८०३/- (रुपये छत्तीस लाख एकोणनव्वद हजार आठशे तीन मात्र)** थकबाकी रकमेच्या वसूलीकरिता ''जसे आहे तसे आहे'', ''जे आहे जसे आहे'', ''जे काही आहे जसे आहे'' या तत्त्वावर **१७.०१.२०२३ रोजी, दु.१२.०० ते दु. १.००** पर्यंत ५ मिनिटाचे अमर्यादित विस्तारासह विकली जाणार आहे. **राखीव किंमत** रु. १७,५०,०००/- (रुपये सतरा लाख पन्नास हजार मात्र) आणि इसारा अनामत रक्कम रु. १,७५,०००/- (रुपये एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र) असेल आणि ईअर सह केव्हायसी सादरीकरणाची शेवटची तारिख **१६.०१.२०२३** सायं. ६.०० पर्यंत.

मिळकतीचा तपशील: ''संकल्प अपार्टमेंट, प्लॉट क्र. ८३, सेक्टर ३५, कामोठे, नवी मुंबई, महाराष्ट्र'' अशा ज्ञात इमारत मध्ये, मोजमापित २३९.३८ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्र जे २२.२४ चौ. मी. शी समतुल्य, ए विंग, तळ मजल्यावर दुकान क्र. ७ चे ते सर्व भाग आणि विभाग. सीमाबध्द पुढीलप्रमाणेः उत्तरः प्लॉट क्र. ८२, दक्षिणः प्लॉट क्र. ८४, ८५, पूर्वः १५ मीटर रुंद रस्ता, पश्चिमः प्लॉट क्र. ८६, ८७, ८८, ८९ **पोस्टल पत्ता:** दुकान क्र. ७, तळ मजला, ए विंग, संकल्प अपार्टमेंट, प्लॉट क्र. ८३, सेक्टर ३५, कामोठे, नवी मुंबई, महाराष्ट्र-४१०२०९.

तारण मत्ताच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत अॅक्टचे कलम १३ च्या पोटकलम ८ च्या तरतुदीनुसार कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे. विशेषत : कर्जदार आणि सर्वसामान्य नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी की, जर सदर लिलाव हा कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाला तर तारण धनको हे खाजगी पद्धतीने द्वारा विक्रीच्या मार्गे सिक्युरिटी इंटरेस्टची अंमलबजावणी करतील. जर विक्री अन्वये मत्तेसंबधीत कोणतेही स्पष्टीकरण/गरज असल्यास बोलीदारांनी **श्री. अग्नेल पिल्लई (+९१ ८९७६९२९६८५), श्री. पुष्कर दानी (+९१ ८१०८३८३६१३), श्री. गुरपाल सिंग (+९१ ८९७६८९८२१२), आणि श्री. राजेंद्र दहिया (+९१ ८४४८२६४५१५)** याच्यांशी संपर्क साधावा. विक्रीच्या तपशिलवार अटी व शर्तीसाठी कृपया कोटक महिंद्रा बँकेची वेबसाईट म्हणजेच www.kotak.com आणि/किंवा https://kotakbank.in/ येथे पुरविलेल्या: https://www.kotak.com/en/bank-auctions.html लिंकचा संदर्भ घ्यावा.

स्थळ : मुंबई, दिनांक : ३०.१२.२०२२ **प्राधिकृत अधिकारी, कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**

जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही येथे खालील **परिशिष्टात** सविस्तर वर्णन लिहिलेल्या जागेच्या (''**सदर जागा**'') (i) रितू शर्मा आणि (ii) सान्या शर्मा (''**मालक**'') याचे हक्क तपासत आणि पडताळत आहोत.

उपरोक्त भाराच्या व्यतिरिक्त, कोणत्याही वैयक्तिक, हिंदु अविभाजित कुटुंब, कंपनी, बँक आणि/किंवा वित्त संस्था, नॉन-बँकींग फायनान्शीअल इन्स्टिट्युशन्स, ट्रस्ट, संस्था, व्यक्तींचा समुह किंवा समावेशन केलेले किंवा न केलेले मंडळ, धनको आणि/किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण यासह अन्य कोणत्याही व्यक्ती/मंडळांचा सदर जागा किंवा तिच्या कोणत्याही हिश्श्याच्या संबंधात किंवा त्या विरुध्द विक्री, हस्तांतरण, अभिहस्तांकन, अदलाबदल, गहाण, भार, अंत्यदान, समन्यायी सुविधाधिकार, तारण, कुळवहिवाट, परवाना, प्रलंबित वाद, धारणाधिकार, दान, न्यास, वारसा, कब्जा, भाडेपट्टा किंवा बोजा, पोट-कुळवहिवाट, काळजी वाहक तत्व, भोगवटा ताबा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, भागीदारी, कोणत्याही विधी न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करार, प्रलंबित दावा आणि/किंवा कोणतेही दायित्व आणि/किंवा लिखापढी आणि/किंवा कोणतीही व्यवस्था आणि/किंवा वचनबध्दता किंवा अन्य कोणत्याही प्रकारे सदर जागेवर कोणताही दावा, अधिकार, हक्क, हितसंबंध, हिस्सा, मागणी असल्यास त्यांनी तसे कृपया निम्नस्वाक्षरीकाराना लेखी स्वरूपात सर्व पुष्ठ्यर्थ दस्तावेजांसह ह्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे, कसूर केल्यास, असा दावा, अधिकार, हक्क किंवा हितसंबंध सोडून दिल्याचे आणि/किंवा त्यागल्याचे समजले जाईल व कोणत्याही प्रकारे बंधनकारक नसेल.

वरील संदर्भातील परिशिष्ट
(सदर चागेचे वर्णन)

मुंबई उपनगर जिल्ह्यातील गाव वांद्रे, तालुका अंधेरीच्या ९४९१.५१ चौ.मी. मोजमापित सीटीएस क्र. जी/६२६ (भाग) आणि जी/१६४ ए (भाग) धारक त्या सर्व अखंड जमिनीवरील स्थित रुस्तमजी''परामाऊंट डी'' वींग नावाच्या इमारतीमधील बेसमेंट-। मधील क्र. बी१-१३३ आणि बी१-१३४ धारक २ (दोन) कार पार्कींग स्पेसेससह एकत्रितरित्या ११९.९५ चौ.मी. (कार्पेट एरिया) म्हणजेच १२९१.१४ चौ. फूट (कार्पेट एरिया) मोजमापित 'डी' वींगच्या २१ व्या मजल्यावरील फ्लॅट क्र.२२०१ सहीत सोसायटीने जारी केलेल्या ८ फेब्रुवारी, २०२० दिनांकित शेअर प्रमाणपत्र क्र. ३५ ने प्रदर्शित विभिन्न क्रमांक ३४१ ते ३५० (दोन्हींसह) असलेले प्रत्येकी रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) चे १० (दहा) संपूर्ण भरणा झालेले शेअर्स.

दिनांक ३० डिसेंबर, २०२२
साठी
LEXICON LAW PARTNERS
ADVOCATES & SOLICITORS
मुल्ला हाऊस, ४था मजला,
५१, एम.जी. रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.
सही/-
भागीदार

ज्या कोणाशी संबंधित असेल त्यांना

सर्वसामान्य जनतेला याद्वारे कळविण्यांत येते की, मी श्रीमती रुक्मीणी सदाशीव शिंदे, स्वर्गीय सदाशिव शिंदे यांची पत्नी, रा-इम्पिरियल शॅडो, बी-१, १३ वा मजला, फ्लॅट क्र. १३०१, एम. पी. मिल्स कंपाऊंड, ताडदेव रोड, मुंबई-४०० ०३४ ने माझे पुत्र श्री. अनंत शिंदे आणि त्याची पत्नी लक्ष्मी अनंत शिंदे व त्यांची मुले आणि भविष्यातील उत्तराधिकारी यांच्याशी माझे सर्व संबंध तोडले आहेत कारण त्यांची गैरवर्तणूक आणि मला घरात होणारी शिवीगाळ. मी कळवते की, मी त्याला व त्याच्या कुटुंबियांना माझ्या जंगम आणि स्थावर मिळकतीमधून तसेच मी सध्या राहते त्या घरातून बेदखल केले व नाकारत आहे हे घर माझ्या कन्येच्या मालकीचे आहे व त्यांने कौटुंबिक व्यवस्थेच्या एका एमओयु द्वारा त्याचा हिस्सा घेतला आहे. दिनांक ०६/०२/२०१० ची कौटुबिक व्यवस्था ही मी आणि माझ्या मुलाने केलेले परस्पर संमतीचे करारपत्र होते कारण माझ्या कन्येला तिचा वाटा द्यायचा होता व आम्हाला त्याा मोबदला प्रदान झाला होता आणि तोमाझ्य कन्येने मला व माझ्या मुलाला समप्रमाणांत दिला होता.

याद्वारे मी, माझी पुजा करण्याचे किंवा हिंदू परंपरे प्रमाणे माझे अंत्यविधी करण्याचे अधिकार देखील काढून घेत आहे. याद्वारे माझ्या अंतिम विधीचे अधिकार मी माझ्या कन्या सौ. आशा राम कांबळे हिला देते आहे व त्यांनी माझ्या इच्छेनुसार पारंपरिक विधी करावेत.

श्री. अनंत शिंदे किंवा त्याच्या पत्नी सौ. लक्ष्मी अनंत शिंदे यांच्याशी कोणीही व्यवहार केल्यास तसे ते त्यांच्या स्वतःच्या जोखीम व जबाबदारीवर करतील आणि त्यांनी केलेल्या कोणत्याही कृती किंवा व्यवहारासाठी मी आणि माझी कन्या जबाबदार नसू.

रुक्मिणी शिंदे

जाहीर सूचना

सूचना घ्यावी की, **पॅरामाऊंट स्पेशालिटी फॉर्गिंग एलएलपी** हे कर्जत, सावरोली खारपाडा रोड, खोपोली, रायगड ४१० २०२ च्या रायगड जिल्हा परिषद आणि उप-प्रबंधकाच्या अधिकारक्षेत्रामधील आणि रायगडच्या जिल्हा विभागामधील आणि गाव धामणी उप-विभाग आणि तालुका खालापूर येथे वसलेले आणि असलेल्या आणि स्थित जुना सर्वे क्र. ३२, हिस्सा क्र. ११, मोज. ०-५१-२ (क्षेत्र) (एच.आर.पी) मूल्यांकन १०२-०० नवीन सर्वे क्र. ४७, हिस्सा क्र. ११ आणि जुना सर्वे क्र. ३२, हिस्सा क्र. ४/डी मोज. ०-०७-० क्षेत्र (एच.आर.पी) मूल्यांकन १४-००, नवीन सर्वे क्र. ४७, हिस्सा क्र. ४डी धारक बिनशेती जमिनीच्या त्या सर्व भाग किंवा विभागांचे (सापेक्ष मिळकत) मालक आहेत. पुढे सन २००६ आधी निष्पादित केलेले आधीचे श्रृंखला करार गहाळ झाले आहेत/सापडण्यासारखे नाहीत.

सर्व व्यक्तीं ज्यांना सदर वरील नमूद गहाळ दस्तावेज सापडल्यास आणि/किंवा सापेक्ष मिळकत किंवा त्याच्या कोणत्याही भागाशी किंवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारे विक्री, अदलाबदल, भेट, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, गहाण, प्रभार, धारणाधिकार, विश्वस्त, वारसा, अंत्यदान, सुविधाधिकार, कब्जा, कल्टिवेशन, भोगवटा, देखभाल, समजोत्याचे ज्ञापन, विकासाधिकार, विक्री करार किंवा याशिवाय कसेहीच्या मार्गे कोणताही अधिकार, नामाधिकार, हितसंबंध, फायदा, दावा किंवा मागणी काही असल्यास लिखित स्वरूपात निम्नस्वाक्षरीकारांना त्या पृष्ठ्यर्थ कागदपत्रीय पुराव्यांसह पीओ क्र. व्ही पटके ॲण्ड कं., वकील, एफ-१, १ला मजला, शाह आर्केड, राणी सती मार्ग, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ, मालाड (पू), मुंबई-४०० ०९७ येथे सदर दिनांकापासून ०७ (सात) दिवसांच्या आत कळविणे, अन्यथा अशा सर्व व्यक्तींनी त्यांचे सापेक्ष मिळकती मधील कोणतेही दावे, अधिकार, हितसंबंध आणि नामाधिकार स्वाधीन केल्याचे समजण्यात येईल आणि काही उरल्यास सापेक्ष मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा दावा, अधिकार, नामाधिकार किंवा हितसंबंध नसतील.

सदर ३० डिसेंबर, २०२२ रोजी दिनांकित
व्ही. पटके ॲण्ड कं.-वकील
एफ-१, १ला मजला, शाह आर्केड,
राणी सती मार्ग, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ,
मालाड (पू), मुंबई-४०० ०९७

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, सिमेन्स लि., (सिमेन्स) कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत स्थापित एक कंपनी आणि जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे बिर्ला अरोरा, लेव्हल २१, प्लॉट क्र. १०८०, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०३०,भारत हे आमच्या अशिलांना येथे खालील पहिल्या परिशिष्टांत सविस्तर वर्णन लिहिलेल्या मिळकतीवर बांधलेली जागा (येथे खालील दुसऱ्या परिशिष्टात सविस्तर वर्णन लिहिलेली) विकण्यास इच्छुक आहेत.

सदर जागा किंवा तिच्या कोणत्याही हिश्श्यांत किंवा त्या विरुध्द विक्री, अभिहस्तांकन, गहाण, न्यास, धारणाधिकार, दान, भार, कब्जा, वारसा, भाडेपट्टा, पोटगी, सुविधाधिकार, जप्ती, प्रलंबित वाद किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा, अधिकार, हक्क आणि/किंवा हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींनी तसेलेखी स्वरूपात, मुळ दस्तावेजांनी पुष्टी करून निम्नस्वाक्षरीकारांना ह्या प्रसिध्दीच्या तारखेपासून १४ दिवसांत कळवणे आवश्यक आहे, कसूर केल्यास अशा व्यक्तींचे असे कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत आणि ते सोडून दि, त्यागले आणि आमच्या अशिलांवर बंधनकारक नाहीत असे गृहीत धरून अशा दाव्याची कोणतीही दखल न घेता सिमेन्स व आमच्या अशिलांच्या परस्परातील संमतीने प्रस्तावित विक्री पूर्ण केली जाईल.

वरील संदर्भातील पहीले परिशिष्ट

ताडदेव, मुंबई येथे स्थित नव महाराष्ट्र नगर सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड, न्यु जायफळवाडी को- ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड आणि जनता हील को- ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड ह्या तीन झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या एकत्रिकरणाचा समावेश असलेल्या त्यावर उभ्या बांधकामांसह एकत्रितपणे सुमारे ५४,३६० चौ.मी. एकत्रित मोजमापाची मलबार अँड कंबाला हील डिव्हीजनच्या सी.एस. क्र. ७२५ (भाग) आणि १/७२५ (भाग) व ३/७२५ (भाग) धारक ती सर्व अखंड जमीन आणि पुढील प्रमाणे सीमाबध्द:
उत्तरेस: सी.एस. क्र. ३/७२५ (भाग)
दक्षिणेस: पोलीस स्टाफ क्वार्टर्स
पूर्वेस: सी.एस. नं. २/७३०, ३/७३० व ७२८.
पश्चिमेस: कंबाला हील, सी.एस. क्र. ३ए/७२३, ७२३, ८ व ९/७२२, ७३३, ७३९ व २/७३३.

वरील संदर्भातील परिशिष्ट

मुंबई शहरच्या नोंदणी जिल्ह्यातील मलबार अँड कंबाला हील डिव्हीजनच्या सी.एस. क्र. ७२५ (भाग) आणि १/७२५ (भाग) धारक इम्पिरियल टॉवर्स, एम. पी. मील कंपाऊंड, बी. बी. नकाशे मार्ग, ताडदेव, मुंबई-४०० ०३४ येथे स्थित 'इम्पिरियल' नावाच्य इमारतीमधील साऊत टॉवर (ए-वींग) मधील ४६ व्या मजल्यावरील २१४७.१५ चौरस फूट (कार्पेट एरिया) मोजमापित फ्लॅट क्र. ४६०४, त्यासह बिल्डिंग इम्पिरियल टॉवरच्या लेव्हल ७ बी वरील क्र. ८८, ८९ व ९० धारक तीन कार पार्कींग स्पेसेससहीत दी इम्पिरियल कंडोमिनियमने जारी केलेल्या शेअर प्रमाणपत्र क्र. १३५ मध्ये समाविष्ट रु. १००/- च्या १ (एक) संपूर्ण भरणा झालेल्या शेअर्स व मिळकती मधील ०.३८% अविभाजित अधिकार, हक्क आणि हितसंबंध.

मुंबई, डिसेंबर, २०२२ च्या ह्या ३० व्या दिवशी दिनांकित.
सही/-
संकेत सेठीया
भागीदार
अनोमा लॉ ग्रुप एलएलपी (अनोमा लिगल)
३ रा मजला, ईएमसीए हाऊस,
शहीद भगत सिंग रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
ई-मेल: sanket.sethia@anomalegal.com